जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट

दिनांक १४.०५.२०२५

मोटार सायकल चोरी करणाऱ्या गुन्हेगारास अटक

दिनांक १२/०५/२०२५ रोजी गुन्हे शाखा, युनिट ४, उल्हासनगर पोलीसांना गुप्त बातमी मिळाली की, अमरडाय कंपनी जवळ उल्हास नदीकडे जाणाऱ्या रोडवर ६ ते ७ इसम चोरीची दुचाकी घेऊन फिरत आहेत, त्या अनुषंगाने सहाय्यक पोलीस उप निरीक्षक/बांडे व त्यांचे पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून तेथील संशयित इसम हर्षद भरत सुपे वय - १९ रा. गायकवाड पाडा विठ्ठल मंदिरा जवळ उल्हासनगर ५ यास ताब्यात घेवून त्याचेकडे अधिक विचारपूस केली असता, त्याने त्याचा अल्पवयीन साथीदार विधी संघर्षीत बालक रा.आंबिवली याचे मदतीने पडघा, कल्याण तालुका पोलीस स्टेशन तसेच वर्तक नगर पोलीस स्टेशन येथे दुचाकी चोरी केल्याचे कबूल केले आहे. त्यांच्या ताब्यातून एकुण ८ मोटार सायकली किंमत सुमारे ३,९०,००० /-रूपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, सदर मोटारसायकलींचा अभिलेख तपासला असता त्याबाबत विठ्ठलवाडी, हिललाईन, कल्याण तालुका, पडघा, वर्तकनगर अशा विविध पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल आहेत. सदर बाबत नमूद गुन्ह्यातील विधी संघर्षित बालक याला त्याचे पालकांचे ताब्यात समज पत्रासह देण्यात आले असून आरोपी नामे हर्षद भरत सुपे यास मुद्देमालसह पुढील कार्यवाहीसाठी विठ्ठलवाडी पोस्टे यांचे ताब्यात देण्यात आले आहे. .

सदरची कामगिरी श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, (शोध-१) यांच्या मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा, घटक-४, उल्हासनगर येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अशोक कोळी, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक/बांडे, सहायक पोलीस उप निरीक्षक/पवार, पोह्वा/थोरवे, गणेश गावडे, योगेश वाघ, मंगेश जाधव, अमर कदम, रितेश वंजारी, पोशि/संजय शेरमाले, प्रसाद तोंडलिकर व रामदास उगले व चालक पोशि अविनाश पवार यांचे पथकाने केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर.



पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर